| | |
|---|---|
| MHST090011302023 | दाखल तारीख– २८/०७/२०२३<br>नोंदणी तारीख– २८/०७/२०२३<br>निकाल तारीख– ०१/०९/२०२३<br>कालावधी– **०० व. ०१ म. ०४ दि.** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी – ए. बी. पाटील)

**नियमित फौजदारी प्रकरण क्र. १९७/२०२३**

निशाणीः– ४.

महाराष्ट्र शासनातर्फे
मिरज लोहमार्ग पो. स्टेशन, } ...अभियोगपक्ष.

**विरुध्द**

**अनिता भरत लोंढे,**
वय. ४० वर्षे, धंदा– घरकाम
रा. पी. डी. भोसलेनगर, रिलायन्स टॉवर जवळ
आर. के. नगर कोल्हापुर. } ...आरोपी.

---

**गुन्हाः– भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये.**

---

**विधिज्ञः**– श्री. एस. आय. सावंत – अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ
श्री. व्ही. एस. शिरतोडे – आरोपीतर्फे विधिज्ञ

**न्यायनिर्णय**

(आज दि. ०१/०९/२०२३ रोजी घोषीत )

आरोपीच्या विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

**<u>अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–</u>**

२. फिर्यादी नामे मृनाली काळे या ठाणे ते जयसिंगपूर असा महालक्ष्मी एक्सप्रेसने झोपुन प्रवास करत असताना बर्थ नं. ३७ वरील महिला प्रवासी यांनी फिर्यादीचा मोबाईल लबाडीने चोरुन नेहला. म्हणून सदरची फिर्याद दाखल करण्यात आली.

३. ठाणे अंमलदार, मिरज लोहमार्ग पोलीस ठाणे यांनी उपरोक्त खबरी आधारे आरोपी विरुध्द गु.र.नं. ४१/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये नोंदविला व सदर प्रकरणाचा तपास पो. ना. ब. नं. ४२१ भोसले यांचे कडे वर्ग केला. तपासादरम्यान तपासी अंमलदाराने घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द ठोस पुरावा आलेने आरोपी विरुध्द तपासी अंमलदार यांनी भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये दोषारोपत्र न्यायप्रविष्ठ केले.

४. प्रस्तुत प्रकरणात आज रोजी आरोपी हजर झाले व त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४१ प्रमाणे तीला गुन्हा कबुल असल्याची पुरसीस निशाणी ३ वर दाखल केली.

५. आरोपीने न्यायालयासमोर तीला गुन्हा कबुल असल्याचे कथन केले. आरोपी हिची केलेल्या चौकशीवरुन ती स्वतः स्वखुषीने गुन्हा कबूल करीत असल्याचे कथन केले आहे. करिता, आरोपीने गुन्हा केल्याचे स्वीकारुन तीला उपरोक्त भारतीय दंड संहिता कलम ३७९ या गुन्ह्या करीता दोषी धरण्यात येते.

६. आरोपी व अभियोग पक्षाचे आरोपीच्या शिक्षेवर म्हणणे ऐकले. अभियोग पक्षाने आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली. तर आरोपी यांनी अनावधानाने तीच्या हातुन गुन्हा घडलेला आहे. आरोपीने प्रस्तुतचा गुन्हा तीचा पहिला

गुन्हा असुन यापुढे ती गुन्हा करणार नाही. करिता कमीत कमी दंड करण्याची विनंती केली.

७. प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, फिर्यादीला जप्त मोबाईल परत करण्यात आला आहे. आरोपी ही एक महिला आहे. प्रस्तुत गुन्ह्यामध्ये एक मोबाईल हा चोरी झालेला आहे. प्रस्तुत गुन्हयाचे स्वरुप व आरोपीची कुटुंबावरील जबाबदारी लक्षात घेता. आरोपीस शिक्षा देवुन जेलमध्ये पाठविणे योग्य व संयुक्तीक वाटत नाही. आरोपीचा प्रस्तुत गुन्हा हा पहीलाच आहे. त्यामुळे न्यायालय उठे पर्यंत शिक्षा व रुपये ३०००/- (तीन हजार रुपये फक्त) दंड व दंड न भरल्यास पाच दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा ही शिक्षा देणे योग्य होईल. त्यामुळे मी अंततः खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. आरोपी अनिता भरत लोंढे हिस भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९ खालील अपराधा करीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४१ प्रमाणे दोषी धरण्यात येते व या अपराधाकरीता न्यायालय उठे पर्यंत शिक्षा व रुपये ३०००/- (तीन हजार रुपये फक्त) दंड व दंड न भरल्यास पाच दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी.

२. जप्त मुद्देमाल मुळ फिर्यादीला परत करण्यात आलेला आहे. सदर मुद्देमाल परतीचे बंधपत्र कायम करण्यात येते.

३. आरोपीला सदर आदेशाची प्रत देण्यात यावी

(सदरहू न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर केला.)

ATUL BHIMRAO PATIL
Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2023.09.04 13:15:22 +0530

कोरेगाव
दि. ०१/०९/२०२३

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव.